महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) या संवर्गात उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत.
श्रीमती तृप्ती दिपक कोलते

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक : नियुक्ती-३५१८/प्र. क्र.४०/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ७ मे, २०१८

वाचा:-

१. गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक : पीडब्ल्यूएफ-०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७, दि. ६.०२.२००९
२. गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक : पीडब्ल्यूएफ-०३१५/प्र.क्र.१०४/पोल-७, दि.१५.०६.२०१६

शासन निर्णय :-

कै. दिपक कोलते, पोलीस नाईक हे पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांच्या आस्थापनेवर कार्यरत होते. दिवंगत दिपक कोलते कर्तव्य बजावत असतांना गुन्हेगारांशी लढताना दिनांक ३.०५.२०१५ रोजी मृत पावल्याने त्यांच्या पत्नी श्रीमती तृप्ती कोलते यांना गृह विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयानुसार सोयी सवलती अनुज्ञेय आहेत. त्यामधील (क) नुसार वर्ग “अ” किवा “ब” मधील शैक्षणिक अर्हता व पात्रतेनुसार शासकीय नोकरीत सामावून घेता येत असल्याने गृह विभागाने श्रीमती तृप्ती कोलते यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन शिक्षण विभागातील गट-ब संवर्गात सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदयांना सादर केला होता. सदर प्रस्तावास मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेच्या अनुषंगाने श्रीमती तृप्ती कोलते यांना महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) या संवर्गातील उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदावर या आदेशान्वये नियुक्ती देण्यात येत आहे.

२. श्रीमती तृप्ती कोलते यांना उपशिक्षणाधिकारी संवर्गातील नियुक्तीबाबत नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पाथर्डी, जि. अहमदनगर या रिक्त पदावर २ वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना देण्यात येत आहे. श्रीमती तृप्ती कोलते यांना वेतन बँड रू.९३००-३४८०० (ग्रेड वेतन रू.४८००/-) या वेतन संरचनेतील उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील गटशिक्षणाधिकारी पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.

३. सदर पदस्थापना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.७.०८.२००० अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. श्रीमती कोलते यांनी

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९.०३.२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहित मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांच्या सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

(२) राज्याच्या प्रशिक्षण धोरणाच्या अनुषंगाने सदर उमेदवाराला विहीत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर प्रशिक्षण संचालक, विद्या प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत आयोजित करण्यात येईल. तसेच सदर प्रशिक्षणाचा कालावधी व रूपरेषा ठरविण्याचे अधिकार संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.

(३) श्रीमती तृप्ती कोलते यांचा परिविक्षा कालावधी दोन वर्षाचा राहील. तसेच श्रीमती कोलते यांची पहिली वेतनवाढ त्यांच्या एक वर्षाचा परिविक्षा कालावधी पूर्ण झाल्यानंतर व त्यानंतरची वेतनवाढ त्यांनी परिविक्षा कालावधी पूर्ण केल्यानंतर देण्यात येईल.

(४) परिविक्षा कालावधीत श्रीमती तृप्ती कोलते यांना प्रचलित नियमाप्रमाणे आवश्यक असणारी विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे व परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. परिविक्षा कालावधीत त्यांनी कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा विहीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता, सेवा समाप्त करण्यात येईल.

(५) श्रीमती तृप्ती कोलते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नसल्यास किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसे न झाल्यास श्रीमती कोलते यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

(६) श्रीमती तृप्ती कोलते यांची नियुक्ती वैद्यकीय तपासणी तसेच चारित्र्य पडताळणीच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येत आहे. चारित्र्य पडताळणी नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत करण्यात यावी अन्यथा ६ महिन्याच्या कालावधी नंतर सदर नियुक्ती संपुष्टात येईल. श्रीमती कोलते यांची वैद्यकीय तपासणी तसेच चारित्र्य पडताळणीबाबतची कार्यवाही आयुक्त (शिक्षण) कार्यालयामार्फत तातडीने करण्यात यावी. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:चापअ-१००८/प्र.क्र.२१४/-०८/१६-अ, दिनांक ९.०१.२००९ नुसार श्रीमती कोलते यांची नियुक्ती करण्यात येत असून चारित्र्य पडताळणीचा अहवाल असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता एक महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात येईल.

(७) महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणांच्या अधिनतेने श्रीमती तृप्ती कोलते यांची जेष्ठता राहील. श्रीमती कोलते यांना त्यांच्या नियुक्तीच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रुजू व्हावयाचे असून त्यानंतर त्यांना रुजू करुन घेण्यात येणार नाही. काही अपरिहार्य कारणास्तव त्यांना रुजू होण्यास मुदतवाढ हवी असल्यास तसे सकारण लेखी कळवून मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. मुदतवाढीसंदर्भात विहित ३० दिवसाच्या कालावधीत मुदतवाढीबाबतचे आदेश निर्गमित न झाल्यास त्यांची मुदतवाढीची विनंती अमान्य केल्याचे गृहीत धरण्यात यावे. तसेच मुदतवाढ दिल्यास मुदतवाढ दिलेल्या मुदतीत ज्या दिनांकास हजर होतील, त्या दिनांकापासून त्यांची जेष्ठता धरण्यात येईल.

(८) वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील तरतुदी श्रीमती तृप्ती कोलते यांना लागू राहतील. तसेच दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्ती वेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांबाबत वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक १८ ऑगस्ट, २००९ मधील तरतुदीदेखील श्रीमती कोलते यांना लागू राहतील.

(९) श्रीमती तृप्ती कोलते यांनी शैक्षणिक अर्हतेबाबत व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या मूळ प्रती तपासणीकरीता व साक्षांकित प्रतींचा संच पदस्थापना स्विकारण्याच्या वेळी संबंधित कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांच्याकडे सादर कराव्यात आणि कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांनी प्रमाणपत्रांची तपासणी करून श्रीमती कोलते यांना रुजू करून घ्यावे.

(१०) श्रीमती तृप्ती कोलते यांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे संबंधित सक्षम यंत्रणेमार्फत तपासण्यात येतील. तपासणीअंती श्रीमती कोलते यांनी सादर केलेली कागदपत्रे खोटी अथवा बनावट आढळल्यास त्यांच्या सेवा कुठलीही पूर्व सूचना न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

(११) श्रीमती तृप्ती कोलते यांनी आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसात नियुक्तीच्या पदावर रुजू व्हावे. विहीत कालमर्यादेत रुजू न झाल्यास सदर नियुक्तीमध्ये स्वारस्य नसल्याचे समजण्यात येईल आणि सदर नियुक्तीकरीता त्यांचे हक्क आपोआप संपुष्टात येईल.

(१२) शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर श्रीमती तृप्ती कोलते यांना शासकीय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी एक महिन्याची पूर्वसूचना शासनास देणे आवश्यक राहील अन्यथा त्यांना एक महिन्याचे वेतन शासनाकडे जमा करावे लागेल.

(१३) श्रीमती तृप्ती कोलते यांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता देण्यात येणार नाही.

(१४) वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांना लागू असलेले प्रचलित नागरी सेवा विषयक सर्वसाधारण नियम सदर उमेदवारांना लागू राहतील.

४. हे आदेश प्राप्त होताच संबंधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल संबंधित कार्यालय प्रमुखांनी आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक क्रमांक २०१८०५०८११५७३३१४२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Depatrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.05.08 11:59:17 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्रीमती तृप्ती कोलते, मु. पो. माळी बाभुळगांव, ता. पाथर्डी, जि. अमदनगर
(आयुक्त शिक्षण यांच्या कार्यालयामार्फत)

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर
३. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
५. संचालक, म. रा. शै. सं. व प्र. प. (महाराष्ट्र विद्या प्राधिकरण) महाराष्ट्र राज्य, पुणे
   यांना सदर उमेदवारांच्या पायाभूत प्रशिक्षणासंदर्भातील कार्यवाही तात्काळ करण्याच्या विनंतीसह.
६. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
८. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / निरंतर), अहमदनगर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर
१०. उपसचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५१/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०० ०२१ (पत्राव्दारे)
११. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती / प्रशा-२ कार्यासन.

प्रत माहितीस्तव :-

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेते (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक
५. मा.विधानसभा सदस्य / मा.विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक
६. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई